माहितीचा अधिकार

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ :- १८० / २०२३ / पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| शंकर परशुराम सुर्यवंशी | कार्यालय अधीक्षक, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था इंदापूर, ता इंदापूर , जिपुणे . | सहाय्यक निबंधक सहकारी संस्था इंदापूर, ता. इंदापूर , जि. पुणे , |

(सुनावणी दिनांक - १८ /०२ /२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचे कडे दि. ०५.०१.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये, अपिल नामंजूर, असे कारण नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी तसेच विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपीलार्थी यांनी दि. ०७.११.२०२२ च्या माहिती अर्जात सिरत नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित इंदापूर या पतसंस्थेचे चेअरमन व संचालक यांनी अर्जदाराची फसवणूक केल्या बाबत अर्जदाराने दिनांक १२/०८/२०२२ रोजी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था पुणे ग्रामीण यांचे कार्यालय यांच्याकडे चौकशी करून कारवाई करण्याची मागणी केली होती. त्या संदर्भामध्ये सदर कार्यालयाने जा. क्र.जिउनिग्रा/सिरत पत/तक्रार/शं.प.सूर्यवंशी/६८५३/१२०२२ या पत्राद्वारे आपल्या कार्यालयाकडे चौकशी करून कारवाई करण्याबाबत कळवण्यात आले होते सदर पत्रावररील कार्यवाही कागदपत्रे मिळावीत.

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थीच्या माहिती अर्जास दि.१/२/२०२३ च्या पत्राने अपिलार्थीस उत्तर दिले की, पतसंस्थेची नोंदणी रद्द झाली असल्याने अभिलेख उपलबध नाहीत, त्यामुळे अर्जाची चौकशी करता येत नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील आदेश दिले आहेत. सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

सदरचे अपिल निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र सत्यमेव जयते पुणे खंडपीठ

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. १८० / २०२३ / पुणे / 7328/2025

दिनांक - 6/3/2025

रामाआ-पुणे/२०२५/